# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र.१५८/२०२१**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या निसर्गरम्य ४११ एकर परिसरात विहाराचा आनंद पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना घेता यावा याकरिता विद्यापीठाने **"SPPU OXY PARK"** या योजनेची घोषणा केली होती. परंतू कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमिवर या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु होवू शकली नव्हती.

सुधारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार सदर योजना दिनांक २१ जून, २०२१ रोजीपासून **"आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या"** औचित्यावर लागू करण्यात येणार आहे.

तरी या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ बाहेरील अभ्यागतांना विद्यापीठाच्या आवारात सकाळी व सायंकाळी व्यायाम व विहारासाठी **"SPPU OXY PARK"** या योजनेचे सदस्यत्त्व नोंदणी करणे आवश्यक आहे. यासाठी इच्छूक असलेल्या अभ्यागतांनी सोबत जोडलेला **"SPPU OXY PARK MEMBERSHIP FORM"** भरुन धनादेशासह विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाकडे कार्यालयीन वेळेत जमा करावा. धनादेश "मा.वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे." या नावाने दयावा. त्यानुसार सदस्यांना विद्यापीठाकडून ओळखपत्र देण्यात येईल व सदर ओळखपत्र पाहूनच विद्यापीठ आवारात प्रवेश दिला जाईल. कृपया याची नोंद घ्यावी.

(टिप - **"SPPU OXY PARK"** साठी असलेल्या सविस्तर मार्गदर्शक सूचना, सोयी-सुविधा, सवलतीं, नियम व अटीं सोबत जोडलेल्या आहेत.)

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

**गणेशखिंड, पुणे : ४११ ००७.**
**जावक क्र. सु.वि./२००/२०२१,**
**दिनांक: १७ / ०६ /२०२१**

**<u>प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठीः-</u>**

०१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, } सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे ही
०२. मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग } विनंती.
०३. मा. व्यवस्थापक, आय.टी. सेल - कृपया सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

D:\sahadev\circular\Circular Drafting.docx

# मार्गदर्शक सूचना, नियम, अटीं, सोयी-सुविधा व सवलतीं

## अ) नाव नोंदणी प्रक्रिया व शुल्क :-

०१. अभ्यागतांनी सोबत जोडलेला **"SPPU OXY PARK MEMBERSHIP FORM"** भरुन विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाकडे जमा करावा.

०२. या "SPPU OXY PARK" मेंबरशिपसाठी वयोमर्यादा कमीत कमी ९ वर्षे पुर्ण असणे आवश्यक आहे.

०३. १६ वर्षे व अधिक वयाच्या सदस्यांना शुल्क आकारणी खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | कालावधी | शुल्क (रुपये) GST सह |
|---|---|---|
| ०१. | मासिक | १०००/- |
| ०२. | सहामाही | ५५००/- |
| ०३. | वार्षिक | १०,०००/- |

(टिप :- ९ ते १६ वर्षे वयोगटातील सदस्यांना सदस्यत्त्व शुल्क आकारले जाणार नाही. परंतू रुपये ५००/- इतके नोंदणी व ओळखपत्र शुल्क आकारण्यात येईल.)

०४. सदर शुल्क अभ्यागतांनी धनादेशाद्वारे जमा करावे. धनादेश "मा.वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे." या नावाने दयावा. धनादेशाच्या पाठीमागील बाजूस स्वतःचे नाव व मोबाईल नंबर नमूद करावा.

०५. शुल्काचा भरणा झाल्यानंतर अभ्यागतांना विद्यापीठाकडून ओळखपत्र देण्यात येईल. सदर ओळखपत्र पाहूनच अभ्यागतांना विद्यापीठ आवारात प्रवेश दिला जाईल.

०६. विद्यापीठ आवारात धुम्रपान व मद्यप्राशन करण्यास सक्त मनाई राहील.

०७. सदस्याकडून विद्यापीठ मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई दयावी लागेल.

## ब) वेळ निश्चिती :-

विद्यापीठाच्या शैक्षणिक वातावरणास बाधा पोहचू नये यासाठी विद्यापीठ आवारात व्यायाम व विहारासाठी येणाऱ्या अभ्यागतांना व्यायाम व विहारासाठी खालीलप्रमाणे वेळ निश्चित करण्यात आलेली आहे. यापैकी एका वेळेची निवड अभ्यागतांनी करावयाची आहे.

०१. पहाटे ०४:३० ते ०८:००
०२. सायंकाळी १८:३० ते २०:००

## क) सवलत :-

या **"SPPU OXY PARK"** क्लबच्या माध्यमातून विद्यापीठ आवारात सकाळी व सायंकाळी व्यायाम व विहारासाठी येणाऱ्या अभ्यागतांना खालील सवलत देण्यात येईल.

१. एकाच कुटूंबातील अधिकच्या एका सदस्यास शुल्कामध्ये २५ टक्के सुट देण्यात येईल.

२. अल्प उत्पन्न गटासाठी शुल्कामध्ये ५० टक्के पर्यंत सुट देण्यात येईल. यासाठी येणारे अर्ज **"SPPU OXY PARK"** क्लबच्या समितीकडे पाठविला जाईल व समितीच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३. विद्यापीठ अधिकार मंडळांचे सदस्य, विद्यापीठ अधिकारी, कर्मचारी व विद्यापीठ आवारात राहणारे रहिवाशी यांना कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही.

४. दिव्यांग व्यक्तींना विनाशुल्क प्रवेश दिला जाईल. यासाठी त्यांनी प्रमाणपत्राची स्वयंसाक्षांकीत प्रत सादर करणे आवश्यक आहे.

**ड) सोयी-सुविधा :-**

या **"SPPU OXY PARK"** क्लबच्या माध्यमातून विद्यापीठ आवारात सकाळी व सायंकाळी व्यायाम व विहारासाठी येणाऱ्या अभ्यागतांना खालील सोयी-सुविधा उपलब्धतेनुसार मोफत पुरविण्यात येतील.

०१. **"SPPU OXY PARK"** या क्लबचे सदस्यत्त्व व तसे ओळखपत्र देण्यात येईल.
०२. आपत्कालीन वैद्यकीय सुविधा व कॉर्डीओ ॲम्ब्युलन्सची सुविधा.
०३. सुरक्षीत वातावरणाची हमी.
०४. ओपन जीमची सुविधा.
०५. मोफत पार्किंग व्यवस्था.
०६. निःशुल्क स्वच्छतागृहाची व पिण्याचे पाण्याची सोय.
०७. वर्षातून किमान एका स्नेह संमेलनाचे आयोजन.
०८. विद्यापीठातील क्रीडा सोयी-सुविधांमध्ये शुल्कात सवलत.
०९. जयकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या / ग्रंथालयाच्या सदस्यत्त्व शुल्कात सवलत.
१०. योगासने अभ्यासवर्ग व इतर प्रशिक्षण वर्ग यासाठी प्राधान्याने सवलत.
११. विद्यापीठाच्या व्यायामशाळेच्या शुल्कात सवलत

(टिप - कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमिवर काही सुविधा प्रतिबंधीत / मर्यादीत असू शकतात, कृपया याची नोंद घ्यावी.)

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

# SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY, PUNE

OXY PARK MEMBERSHIP FORM 20 -

| | | |
|---|---|---|
| 1. Name | ------------------------------------------------ | Paste Passport size Photographs |
| 2. Father's Name | ------------------------------------------------ | |
| 3. Identification Adhar Card No | ------------------------------------------------ | |
| 4. Date of Birth | ------------------------------------------------ | |

5. Amount Deposited ..................................................................

6. Profession (for outsiders) ..................................................................

7. Address ..................................................................

..................................................................

..................................................................

8. Mobile No. ..................................................................

9. Mobile No. (in case of emergency) ..................................................................

10. Email ID ..................................................................

11. Timing opted (Tick only one) **Morning/Evening**

I wish to walk at my own risk and responsibility and have no objection for the same. I have carefully read the regulations regarding use of the campus and promise to abide by the same.

Signature of the Applicant

---

I have no objection to my son/daughter/ward seeking walking membership at Savitribai Phule Pune University Oxy Park, Pune.

Signature of Guardian / Parents

---

Note: 1) For securing membership everybody must submit two passport size photographs.

2) Kindly read the instruction/ rules & regulations overleaf carefully before filling the membership form.